ICE 'n' SPICE
व्हेज रेस्टॉरन्ट
पंजाबी डिशेस् । पावभाजी । चाईनीज । ज्युसेस् । आईस्क्रीम
गोदावरी कॉम्प्लेक्स,व्ही.आय.पी.रोड,नांदेड
मो. 9422172572, 9850430189

सायं दैनिक
# नांदेड वार्ता
www.nandedwarta.com

•वर्ष २४ वे • अंक २२७ • शनिवार दि.६ जून २०२६ • नांदेड • पोस्ट परवाना क्र.जी.-२/आरएनपी/एनएनडी-२६२/२०२३-२०२५ • पाने ४ • किंमत १ रु.

## 'बेटा,तुमसे ना हो पाएगा'! पेपरफुटीवरुन केंद्र सरकारवर 'कॉकरोच'चा हल्लाबोल

### जंतर-मंतरवर अभिजीत दीपके यांचे आंदोलन;शिक्षणमंत्र्यांच्या राजीनाम्याची मागणी

नवी दिल्ली:निदर्शने, मोर्चे आणि आंदोलनांनी काय साध्य होतं? यातून एवढंच सिद्ध होतं की आपण जिवंत आहोत. सरकारसाठी आपण कदाचित किडे असू, पण आपल्या हक्कांसाठी लढण्याची ताकद आपल्यात आहे, अशा शब्दांत कॉकरोच जनता पार्टीचे संस्थापक अभिजीत दीपके यांनी केंद्र सरकारवर जोरदार टीका केली. नीट परीक्षा पेपरफुटी प्रकरणाच्या निषेधार्थ कॉकरोच जनता पार्टीतर्फे शनिवारी दिल्लीतील जंतर-मंतरवर पाच तासांचे आंदोलन करण्यात आले.




अभिजीत दिपके हे शनिवारी सकाळी अमेरिकेतून दिल्लीला परतले होते. विमानतळावर दिपके हे दीड तास थांबले होते. पोलीसांनी त्यांना जंतर मंतरवर सकाळी १० ते सायंकाळी ५ पर्यंत आंदोलनाची परवानगी दिली. विमानतळावरुन आंदोलन-स्थळी जातांना अभिजित दिपके यांच्या हातात बाबासाहेब आंबेडकर यांचा फोटो असलेले पुस्तक होते. ते विमानतळावरून थेट जंतर मंतरला गेले. कॉकरोच जनता पार्टीने दिल्लीतील आंदोलनादरम्यान अभिजीत दीपके यांनी केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी पाच दिवसांच्या आत राजीनामा द्यावा, अशी मागणी केली. अन्यथा पुढील शनिवारी पुन्हा जंतर-मंतरवर तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही त्यांनी दिला. शनिवारी सकाळी अमेरिकेतून दिल्लीत परतलेल्या दीपके यांनी विमानतळावरून थेट जंतर-मंतर गाठले. सकाळी दहा वाजता सुरू झालेले आंदोलन दुपारी तीन वाजेपर्यंत सुरू होते. या आंदोलनात हजारो विद्यार्थी, तरुण, पालक तसेच काही ज्येष्ठ नागरिकांनी सहभाग नोंदविला. आंदोलनस्थळी विविध घोषणांनी परिसर दणाणून गेला. आंदोलनात प्रसिद्ध सामाजिक कार्यकर्ते सोनम वांगचुक यांनीही उपस्थिती पान ४ वर

## महाराष्ट्रात मान्सूनचे आगमन; राज्यभर पावसाची चाहूल



मुंबई/प्रतिनिधी-अखेर नैऋत्य मोसमी पाऊस (मान्सून) महाराष्ट्रात दाखल झाला असून तळकोकणात विजांच्या कडकडाटासह जोरदार पावसाने हजेरी लावली आहे. हवामान विभागाने मान्सूनच्या महाराष्ट्रातील अधिकृत प्रवेशाची घोषणा केली असून पुढील काही दिवसांत तो राज्याच्या उर्वरित भागांमध्येही सक्रिय होण्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे.

केरळमध्ये दाखल झाल्यानंतर अवघ्या दोन दिवसांत मान्सूनने वेगाने आगेकूच करत गोवा पार केला आणि दक्षिण कोकणात प्रवेश केला. शुक्रवारी संपूर्ण गोवा व्यापल्यानंतर मान्सून महाराष्ट्रात कधी दाखल होणार याकडे सर्वांचे लक्ष लागले होते. अखेर ही प्रतीक्षा संपुष्टात आली आहे. हवामान विभागाच्या माहितीनुसार, दक्षिण कोकणातील अनेक भागांमध्ये सध्या मान्सून सक्रिय झाला असून पावसाची तीव्रता वाढत आहे. पुढील ४८ तास मान्सूनच्या पुढील प्रवासासाठी अत्यंत अनुकूल असल्याने मुंबई, ठाणे, रायगडसह पान ४ वर

## भुजबळ राज्यसभेवर तर पुतणे समीर राज्यात मंत्री?

मुंबई/प्रतिनिधी-राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते तथा राज्याचे अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांची राज्यसभेवर नियुक्ती जवळपास निश्चित मानली जात आहे. उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या राजीनाम्यामुळे रिक्त झालेल्या या जागेसाठी भुजबळ यांचे नाव सुरुवातीपासूनच आघाडीवर होते. आता शनिवारी झालेल्या महत्त्वाच्या बैठकींमुळे त्यांच्या उमेदवारीची शक्यता अधिक बळकट झाली आहे. त्याचसोबत त्यांचे पुतणे समीर भुजबळ यांना राज्यात मंत्रिपद मिळण्याची शक्यता राजकीय वर्तुळात व्यक्त केली जात आहे.



राष्ट्रवादी काँग्रेसच्या कोट्यातील रिक्त झालेल्या राज्यसभा जागेवरून राज्याच्या राजकारणात मोठ्या हालचालींना वेग आला आहे. शनिवारी दुपारी राष्ट्रवादी काँग्रेसचे खासदार पार्थ पवार, प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे, प्रफुल पटेल आणि छगन भुजबळ यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली. या बैठकीनंतर राष्ट्रवादीचे प्रमुख नेते थेट छगन भुजबळ यांच्या निवासस्थानी दाखल झाल्याने राजकीय चर्चांना उधाण आले आहे. पक्षाकडून राज्यसभा उमेदवारीबाबत लवकरच अधिकृत घोषणा होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.दरम्यान, गेल्या काही दिवसांत भाजप नेत्या नवनीत राणा यांचे नावही राज्यसभा उमेदवारीसाठी चर्चेत आले होते. त्यामुळे राष्ट्रवादीच्या गोटात काहीशी अस्वस्थता निर्माण झाली होती. मात्र, आजच्या घडामोडींनंतर पान ४ वर




छत्रपती शिवाजी महाराज यांच्या ३५२ व्या शिवराज्याभिषेक दिनानिमित्त छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास दुग्धाभिषेक व अभिवादन करुन उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी पोलीस उपमहानिरिक्षक शहाजी उमाप, प्रा.संतोष देवराय यांच्यासह इतर मान्यंवर उपस्थित होते.

## सोयीस्कर न्याय की,सोयीस्कर याचिका?

## जिल्हा बँकेच्या मतदार यादीवर आक्षेप;पण काही नावेच रडारवर

सरफराज दोसानी

माहूर:जिल्हा बँकेच्या अंतिम मतदार यादी विरोधात दाखल झालेल्या याचिकेमुळे सहकार क्षेत्रात चर्चांना उधाण आले आहे. विशेष म्हणजे, विभागीय सहनिबंधक प्रविण फडणवीस यांनी एका आदेशातून अनेक मतदारांच्या पात्रतेबाबत निर्णय दिला असताना, न्यायालयात आव्हान देताना त्यातील काही निवडक मतदारांनाच याचिकेत समाविष्ट करण्यात आल्याने विविध प्रश्न उपस्थित होत आहेत.



याचिकाकर्ते राजेंद्र नामदेवराव केशवे यांनी मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठात रिट याचिका दाखल केली आहे. यामध्ये काही मतदारांचा समावेश अंतिम मतदार यादीत करण्यात आल्यास आक्षेप नोंदविण्यात आला आहे. मात्र, विभागीय सहनिबंधकांच्या त्याच आदेशात समाविष्ट असलेल्या काही अन्य मतदारांविरोधात याचिकेत कोणताही आक्षेप नोंदविण्यात आलेला नाही. याचिकेत पुरुषोत्तम येरडलवार (आदिवासी विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था, सिंदखेड), समाधान भालचंद्र जाधव (सेवा सहकारी संस्था, वाई बाजार), अरुण बळीराम राठोड (हरडप), अनिल सीताराम रुनवाल (आसोली), निखिल अर्जुन जाधव (लखमापूर), ज्योतिबा जयराम खराटे (अंजनखेड), नंदकिशोर बळवंतराव सिद्देवार (करंजी) आणि माणिकराव गणपतराव कदम (वायफणी) यांच्याविरोधात आक्षेप घेण्यात आला आहे.

दुसरीकडे, त्याच आदेशातील मारोती लालसिंग राठोड (मुंगशी), अमजदखाँ अनवरखाँ पठाण (गोंडवडसा), किसन दामा राठोड (नखेगाव) आणि अन्य एका प्रतिनिधीचे नाव याचिकेत समाविष्ट नसल्याची चर्चा सहकार क्षेत्रात सुरू आहे. त्यामुळे आक्षेप नोंदविण्याचा निकष नेमका काय होता, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. या पार्श्वभूमीवर, विभागीय सहनिबंधकांनी दिलेल्या निर्णयातील काही नावे वगळूनच न्यायालयीन पान ४ वर

## खुपसरवाडी येथे पाणी पुरवठा नळ योजना मंजूर करण्याची ग्रामस्थांची मागणी

नांदेड/प्रतिनिधी-मौजे खुपसरवाडी येथे कायमस्वरुपी पाणी पुरवठा करणारी योजना नसल्याने ग्रामस्थांना पाण्यासाठी वणवण भटकावे लागते. जलजीवन मिशन योजनेचे मंजुर झालेले कामही अर्धवटच आहे. शासनाने कायमस्वरुपी पाणीपुरवठा योजना तात्काळ मंजुर करावी अशी मागणी ग्रामस्थांनी एका निवेदनाद्वारे जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्याकडे केली आहे.

मौजे खुपसरवाडी येथील पिण्याच्या पाण्याचा प्रश्न अनेक वर्षांपासून प्रलंबितच आहे. मार्कंड शिवारातील गुरुद्वारा लंगर साहिबच्या शेतातील खाजगी विहिरीमधून गेल्या दहा ते पंधरा वर्षापासून संपुर्ण गावाला पाणी पुरवठा केला जातो. विहिरीपासून ते मौजे खुपसरवाडी पर्यंत ३ इंच पाईप लाईनने हा पाणी पुरवठा नियमित होत आहे. परंतु सदरील पाईप लाईन जागोजागी फुटलेली असून नादुरुस्त आहे. त्यामुळे पाणी शेतामध्ये वाया जात असून गावाच्या टाकीपर्यंत पोहचत नाही. सदरील पाईप लाईन ही जुनी असल्याने जागोजागी वारंवार फुटत आहे. नवीन विहिर ते पाण्याच्या टाकी पर्यंत चार इंची पाईप लाईन रस्त्याच्या बाजुने करणे आवश्यक आहे. गुरुद्वारा लंगर साहिब हे खुपसरवाडीमधील नागरिकांना पाणी देण्यासाठी तयार आहेत. परंतु त्यासाठी चार इंची नवीन पाईपलाईन आवश्यक असल्याचे ग्रामस्थांनी म्हटले आहे. खुपसरवाडी गावाला पाण्याचा शासकीय स्त्रोत उपलब्ध नाही. त्यामुळे गावात पाण्याची तीव्र टंचाई निर्माण झाली असून लोकप्रतिनिधी व प्रशासनाने गांभिर्याने लक्ष देवून विहिर ते पाण्याची टाकी पर्यंत चार इंची पाईप लाईन तात्काळ मंजूर करावी अशी मागणी ग्रामस्थांनी केली. या निवेदनावर महाजन भीमराव मंडले, शेख अहेमद, शेख महेमुद, रावसाहेब बंदावाड, शेख मुस्तफा शेख मन्सुर, शेख नसीर शेख रशीद, स. सलीम स.जाफर व इतर ग्रामस्थांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## शिवरायांच्या लोककल्याणकारी विचारांचा आदर्श घेऊन शासन योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी कर्मचाऱ्यांनी कटिबद्ध राहावे-जिल्हाधिकारी

नांदेड/प्रतिनिधी-छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेक दिनानिमित्त नांदेड जिल्हा परिषदत आज शिवस्वराज्य दिन उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. यावेळी शिवरायांच्या लोककल्याणकारी, न्यायप्रिय आणि जनहितवादी प्रशासन व्यवस्थेचा आदर्श घेऊन शासनाच्या विविध विकास योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी अधिकारी व कर्मचाऱ्यांनी कटिबद्ध राहावे, असे आवाहन जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी केले.

कार्यक्रमास जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक मेघना कावली, पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक डॉ. संजय तुबाकले, उपमुख्य कार्यकारी अधिकारी राजकुमार मुक्कावार, मुख्य लेखा व वित्त अधिकारी महेश देशमुख यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी जिल्हाधिकारी राहुल कर्डिले व मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना कावली यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. तसेच गुढीपूजन व गुढी उभारणी करून शिवस्वराज्य दिन साजरा करण्यात आला. श्री चैतन्य इंग्लिश स्कूलच्या विद्यार्थ्यांनी राष्ट्रगीत व महाराष्ट्र गीत सादर करून कार्यक्रमाची सुरुवात केली. यावेळी राहुल कर्डिले म्हणाले, छत्रपती शिवाजी महाराजांनी रयतेच्या कल्याणासाठी आदर्श प्रशासन उभे केले. शेतकऱ्यांना मदत, सिंचन व्यवस्थेचा विकास, न्याय्य कारभार आणि दूरदृष्टीपूर्ण नियोजन यामुळे त्यांचे राज्य लोकाभिमुख ठरले. प्रत्येक अधिकारी आणि कर्मचाऱ्याने आपल्या कामातून शिवरायांच्या प्रशासनाची मूल्ये जपली पाहिजेत, असेही ते म्हणाले. कार्यक्रमात शाहीर रमेश गिरी आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी पोवाडे व शाहिरी सादर करून उपस्थितांना शिवचरित्राची प्रेरणादायी आठवण करून दिली. उपस्थित मान्यवरांचा शाल, पुस्तक आणि जिल्हा परिषदेचा लोगो असलेला स्मृतिचिन्ह कप देऊन सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. संजय तुबाकले यांनी केले. सूत्रसंचालन पद्माकर कुळकर्णी व मिलिंद व्यवहारे यांनी केले, तर आभार उपमुख्य कार्यकारी अधिकारी राजकुमार मुक्कावार यांनी मानले.



यावेळी डॉ. एस. बी. खुणे, डॉ. प्रविणकुमार घुले, वंदना फुटाणे, डॉ. निलकुमार ऐतवडे, सत्येंद्र आऊलवार, राहुल रावसाहेब, डॉ. संतोष सूर्यवंशी यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# वातावरणातील बदल आणि वाढती पर्यावरणीय संकटे

**गेल्या काही दशकांपासून जगभरात हवामान बदल हा चिंतेचा विषय बनला आहे. पूर्वी पर्यावरण तज्ज्ञांनी दिलेल्या इशाऱ्यांकडे अनेकदा दुर्लक्ष करण्यात आले; मात्र आज हवामानातील बदलांचे गंभीर परिणाम प्रत्यक्ष अनुभवास येत आहेत. वाढते तापमान, अनियमित पाऊस, दुष्काळ, पूर, वादळे आणि जैवविविधतेचा ऱ्हास या सर्व घटना हवामान बदलाच्या संकटाची जाणीव करून देतात. मानवी विकासाच्या नावाखाली निसर्गाचा झालेला अविचारी वापर आणि पर्यावरणाची सातत्याने होत असलेली हानी ही या संकटाची प्रमुख कारणे आहेत. मानवाच्या वाढत्या गरजा पूर्ण करण्यासाठी जंगलतोड, डोंगर-दऱ्यांची मोडतोड, खाणकाम, औद्योगिकीकरण आणि शहरीकरण यांना प्राधान्य देण्यात आले. विकासाच्या या प्रक्रियेत पर्यावरणीय संतुलनाचा विचार दुय्यम ठरला. परिणामी वातावरणातील कार्बन डायऑक्साइडसह हरितगृह वायूंचे प्रमाण वाढले आणि जागतिक तापमानवाढीचे संकट अधिक गडद झाले. पर्यावरण तज्ज्ञांनी अनेक वर्षांपूर्वीच ग्लोबल वॉर्मिंगबाबत इशारा दिला होता; परंतु त्याकडे गांभीर्याने पाहिले गेले नाही.महाराष्ट्रातही या समस्येचे स्वरूप गंभीर आहे. राज्यातील गडचिरोलीसारखी समृद्ध जंगले विविध विकास प्रकल्प आणि खाणकामामुळे धोक्यात आली आहेत. जंगल हे केवळ झाडांचे समूह नसून ते जैवविविधतेचे आणि पर्यावरणीय संतुलनाचे आधारस्तंभ आहेत. जंगल तोडीमुळे वन्यजीवांचे अधिवास नष्ट होतात, भूजलपातळी कमी होते आणि वातावरणातील कार्बन शोषून घेण्याची नैसर्गिक क्षमता घटते. त्याचप्रमाणे नाशिकमध्ये कुंभमेळ्यासारख्या मोठ्या धार्मिक कार्यक्रमांच्या निमित्ताने अनेक जुन्या वृक्षांवर कुऱ्हाड चालवली जात असल्याच्या घटना चिंताजनक आहेत. विकास किंवा धार्मिक सोयीसुविधा निर्माण करताना पर्यावरणाचा विचार करणे ही काळाची गरज आहे.हवामान बदलाचे परिणाम आता अधिक स्पष्टपणे जाणवू लागले आहेत. यावर्षीच्या उन्हाळ्यात देशातील अनेक भागांत तापमानाने विक्रमी पातळी गाठली. उष्णतेच्या लाटांमुळे जनजीवन विस्कळीत झाले, आरोग्यविषयक समस्या वाढल्या आणि शेतीवरही त्याचा विपरीत परिणाम झाला. पारंपरिक अनुभवांनुसार ज्या वर्षी उन्हाळा तीव्र असतो, त्या वर्षी पावसाचे प्रमाणही अधिक असते, अशी धारणा आहे. मात्र आज निसर्गाच्या चक्रातच मोठे बदल होत आहेत. त्यामुळे पूर्वीची हवामानविषयक गणिते अनेकदा चुकीची ठरत आहेत. यंदा अल निनो या हवामान घटनेमुळे पावसाचे प्रमाण कमी होण्याची शक्यता हवामान विभागाने व्यक्त केली आहे. अल निनोमुळे समुद्राच्या पृष्ठभागाचे तापमान वाढते आणि त्याचा परिणाम जगभरातील पर्जन्यमानावर होतो. भारतासारख्या कृषिप्रधान देशासाठी ही बाब अत्यंत महत्त्वाची आहे. कमी पाऊस झाल्यास शेती उत्पादन घटू शकते, पिण्याच्या पाण्याचा प्रश्न निर्माण होऊ शकतो आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेवर मोठा परिणाम होऊ शकतो. त्यामुळे हवामान बदल आणि त्यातून निर्माण होणाऱ्या संकटांकडे केवळ पर्यावरणीय नव्हे तर आर्थिक आणि सामाजिक प्रश्न म्हणूनही पाहणे आवश्यक आहे.या संकटावर मात करण्यासाठी केवळ सरकारची जबाबदारी नाही, तर प्रत्येक नागरिकानेही आपली भूमिका ओळखली पाहिजे. वृक्षारोपण आणि वृक्षसंवर्धन, पाण्याचा काटकसरीने वापर, प्रदूषण कमी करणे, अक्षय ऊर्जेचा वापर वाढवणे आणि पर्यावरणपूरक जीवनशैली स्वीकारणे यांसारख्या उपाययोजना प्रभावी ठरू शकतात. त्याचबरोबर विकास प्रकल्पांची आखणी करताना पर्यावरणीय परिणामांचा सखोल अभ्यास करूनच निर्णय घेणे आवश्यक आहे.हवामान बदल हे भविष्यातील नव्हे तर वर्तमानातील संकट आहे. आज आपण योग्य पावले उचलली नाहीत, तर पुढील पिढ्यांना त्याची मोठी किंमत मोजावी लागेल. विकास आणि पर्यावरण यांच्यात समतोल साधणे हीच काळाची खरी गरज आहे. निसर्गाचे संरक्षण म्हणजेच मानवाच्या अस्तित्वाचे संरक्षण होय. त्यामुळे पर्यावरण संवर्धनाला सर्वोच्च प्राधान्य देऊन शाश्वत विकासाचा मार्ग स्वीकारणे हाच या संकटातून बाहेर पडण्याचा एकमेव पर्याय आहे.**

## २०२६ सीईटी परीक्षेचा निकाल लवकरच येणार आहे...

# इंजिनीरिंग कॉलेज निवडताना घ्यायची दक्षता

पालक आणि विद्यार्थी विचारात आहेत कोणते कॉलेज निवडायचे. इंजिनीरिंग कॉलेज निवडताना खालील बाबींचा विचार करावयास हवा १. प्रवेश कट ऑफ किमान आणि कमाल CET/JEE स्कोर), २. कॉलेज अकॅडेमिकस (प्रभावी शिक्षण पद्धत), ३. कॉलेज अट्टेण्डएन्स (वर्ग हजेरीची सक्ती), ४. कॉलेज प्लेसमेंट्स (रोजगार संधी आणि त्या भिमुखप्रशिक्षण), ५. कॉलेज ची फीस (शिक्षण शुल्क) वरील बाबी पालक पसंती क्रमाने बदलू शकतात.



१. प्रवेश कट ऑफ (किमान आणि कमाल CET/JEE स्कोर) दर वर्षी कट ऑफ आणि percentile मर्यादा कमी जास्त होतच असते. त्यानुसार गेल्या ३ वर्षाचा स्कोरपाहून ऐक जवळपास अंदाज काढता येतो. अथवा कॉन्सुलटंट सल्लागारयांचे कढून पण आपल्या उपलब्धी प्रमाणे घेऊ शकता. हा कट ऑफमेरिट नुसार खाली वर असतोय.२. कॉलेज अकॅडेमिकस (प्रभावी शिक्षण पद्धत) काही कॉलेजेस अकॅडेमिकसवर भर देतात, वर्गात शिक्षणावर भर असतो. तर काही कॉलेज हे ऑनलाईन शिक्षणावर भर देतात. आपल्या पाल्याला काय झेपेल या नुसार भवतालच्या विद्यार्थ्यांकडून माहिती घेऊन हा निर्णय घेता येतो. आपला पाल्य चांगलाच हुशार असेल तर तो ऑनलाईन शिक्षणावर पण चांगले गुण मिळवू शकतो. तसे नसेल तर क्लासरूम टीचिंग असलेले कॉलेज निवडावे.

३. कॉलेज अट्टेण्डएन्स (वर्गहजेरीची सक्ती). काही कॉलेजेस मध्येकॉलेज अट्टेण्डएन्सची सक्ती असते, काही मध्ये नसतेयाचा अभ्यास करणे गरजेचे आहे. या मुलेमुलामध्ये शिक्षणाची ओढ आणि आवड राहते व दर्जे दारशिक्षण मिळते. ४. कॉलेज प्लेसमेंट्स (रोजगार संधी आणि त्या भिमुख प्रशिक्षण) : काही कॉलेज मध्ये प्लेसमेंट वर भर नसतो, काही कॉलेजेस मध्ये असतो याचा सर्वेकरूनच कॉलेजची निवड करावी. सर्व पालक प्रामुख्याने कॉलेज प्लेसमेंट्स मध्ये इंटरेस्टेड असतात. आज काल सर्व कॉलेजच्या संकेत स्थळावर ८०% प्लेसमेंट नमूद केलेले असते. त्याची खातीर जाणकारांकडून करूनघेणे अत्यंत महत्वाचे आहे. प्रत्येक कॉलेज आपापले कौतुक सांगत असते. ५. कॉलेज ची फीस (शिक्षण शुल्क)-दार वर्षी प्रत्येककॉलेज शिक्षण शुक्ल काही प्रमाणात वाढवतअसते. प्रामुख्याने पहिल्या वर्षीचे शुल्क हे पुढच्या चारवर्षासाठीचे ठरलेले असते. पालकांचे वार्षिक उत्पन्न आणि होणारा खर्चयाची सांगड घालूनच निर्णय घ्यावा.अजून काही या महत्वाच्या बाबीचा विचारकरावा १. रेगुलर शासकीय युनिव्हर्सिटी संलग्न कॉलेज म्हणजे काय..?, २. ऑटोनॉमस (अभिमत )कॉलेज म्हणजे काय..?, ३. खाजगी अभिमत विद्यापीठ म्हणजे काय...?, १. रेगुलर शासकीय युनिव्हर्सिटी संलग्न कॉलेजम्हणजे काय..? जे कॉलेज शासनाने शासित केलेल्या विद्यापीठाशी संलग्न आहे त्यात अभयसक्रमहा त्या विद्यापीठाने निर्धारित केलेला असतो व शिक्षणशुल्क पण शासनाने निरंतधारीतकेलेल्या निकषा नुसार असते. अश्या कॉलेज मध्ये अभ्यासक्रम बदलणे एवढे सोपे नसते (BATU, SPPU, BAMU, NU, Shivaji University, SRTMU ETC). यांची मार्कशीट आणि पदवी सुद्धायाच विद्यापीठाची असते. पेपर सेटिंग, चेकिंगपण विद्यापीठच करते. यांच्यातकॉलेज सहभाग फक्त शिकवणे आणिपरीक्षा घेणे या पुरताच मर्यादित असतो.

२. ऑटोनॉमस (अभिमत) कॉलेज म्हणजे काय..?

अशी कॉलेजेस मध्ये शैक्षणिक अभ्यासक्रम हा कॉलेज ठरवतेआणि शासकीय विद्यापीठ त्याला मान्यता देते. वाढीव आणि कौशल्या धारितविषय ज्या मुले रोजगारक्षमता वाढते असे विषय हेकॉलेज अभ्यासक्रमात लगेच आणू शकते. असे विषय याला शासकीय विद्यापीठ त्याला मान्यता देते. यामुळे त्या कॉलेज चेप्लेसमेन्ट वाढतेव शैक्षिणक शुल्क हे वाढलेले असूशकते. या कॉलेज चेपेपर कॉलेजच काढते आणी चेकिंग सुद्धा कॉलेजच करते. इथेमार्कशीट विद्यापीठाची असते. वपदवीपण विद्यापीठाचीच मिळते. या कॉलेज लाफी माफी विषयक वसर्व कोटा(ओपन,ओबीसी,एससी) हा शासन नियमाप्रमाणे निर्धारित पाहतो ऍडमिशन सर्व शासन नियमाप्रमाणे होत असतात.

३. खाजगी अभिमत विद्यापीठ म्हणजे काय...?

आज काल शिक्षणाचा खर्चाचाबोजा शासनानं कमी करण्याच्या हेतूने- फी रिसेर्व्हशन, ऍडमिशन रेगुलेशन हे स्वयम निर्धारित असतात.यात काही प्रमाणातच शासनाचा अंकुश असतो. अशी कॉलेजेसमध्ये शैक्षणिक अभ्यासक्रम हा कॉलेज ठरवतेया कॉलेजचे पेपर कॉलेजच काढते आणी चेकिंग सुद्धा कॉलेजच करते. इथे मार्कशीट खासगी विद्यापीठाची असते.व पदवीपण खासगी विद्यापीठाचीच मिळते.हि सगळी सिस्टिमसेल्फ रेग्युलेटेड असते जो गुणवत्ता टिकवतो तोच टिकतो यासिद्धांतावर हे चालते.

**-प्रा.प्रमोद दस्तूरकर**

२५ वर्षांपासून अभियांत्रिकी प्राध्यापक (माजी डायरेक्टर प्लेसमेंट MIT,Trinity कॅम्पस, JSPM)

www.mycareerveda.com पुणे. www.dastoorkar.com

# कंधार तालुक्यातील १०० ग्रामपंचायतीच्या सदस्य पदाच्या आरक्षण सोडतीचा कार्यक्रम जाहीर!

## ९ जून ते १२ जून २०२६ या कालावधीत ग्रामपंचायत स्तरावर होणार आरक्षण सोडत

कंधार/प्रतिनिधी-कंधार तालुक्यातील एकूण १०० ग्रामपंचायतीच्या सदस्य पदाची आरक्षण सोडत ही दि.९ जून ते १३ जून या कालावधीत संबंधित ग्रामपंचायत कार्यालय येथे सकाळी १०:०० वाजता होणार आहे. त्यामुळे ग्रामपंचायत सदस्यांच्या आरक्षण सोडतीच्या वेळी ग्रामपंचायत अंतर्गत च्या सर्व नागरिकांनी वेळेवर उपस्थित राहावे, असे आवाहन तहसीलदार रामेश्वर गोरे यांनी केले आहे.

राज्य निवडणूक आयोग महाराष्ट्र यांचे पत्र क्र. रानिआ/ ग्रापंनि-२०२५/प्र.क्र.०३/ का-८ दिनांक-२६/५/२०२६ नुसार राज्यातील सन २०२४ व २०२६ मध्ये मुद्दती संपलेल्या व सन २०२६ या कालावधीत मुदत संपणाऱ्या नवनिर्मित ग्रामपंचायतीच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी सदस्यांच्या आरक्षण सोडतीचा कार्यक्रम जाहीर झाला आहे. दि.९ जून रोजी ग्रामपंचायत सदस्य आरक्षण सोडत होणाऱ्या ग्रामपंचायतीची नावे असी अंबुलगा, बिजेवाडी, शेकापूर, धानोरा (कौ.), कौठा, बाचोटी, पांगरा, चिखलभोसी, घोडज, महालिंगी, हासूळ, दहीकळंबा, हरबळ, बामणी (पक.), सावळेश्वर, भेंडेवाडी, मानसिंगवाडी, दैठणा, नारनाळी, खंडगाव (हमीद), शिरशी (खु.) मंगलसांगवी, हाडोळी (ब्र.), कुरुळा, नावंद्याचीवाडी. दि.१० जून-शेल्हाळी, बहाद्दर, चिखली राऊतखेडा, शिरूर, चिंचोली (पक.), सांगुचीवाडी, नवघरवाडी, बोरी (खु.), नंदनशिवणी, हटक्याळ, लाडका, गुंटूर, उस्माननगर, भुत्याचीवाडी, घागरदरा, भोजूचीवाडी, गुट्टेवाडी, येलूर, जाकापूर, शिरशी बु.), नंदनवन, उमरगा (खो.), नागलगाव, वाखरड.दि.११ जून-फुलवळ, संगमवाडी, औराळ, काटकळंबा, बारूळ, गोगदरी, वंजारवाडी, बाबुळगाव, बोळका, मोहिजा परांडा, कारतळा, लाठ (खुर्द), तेलंगवाडी, शिराढोण, दिग्रस (बु.), कंधारेवाडी, मादाळी, मंगनाळी, पेठवडज, रहाटी, मजरे धर्मापुरी, रुई, दुर्गातांडा, बोरी (बु.). दि.१२ जून - मुंडेवाडी, तळ्याचीवाडी, चौकी महाकाया, तेलूर, बाळंतवाडी, खुड्याचीवाडी, पानभोसी, गंगनबीड, हिप्परगा (श.), वाहाद, गुंडा-बिंडा-दिंडा, भूकमारी, भंडार-कुमठ्याचीवाडी, दाताळा, नाईकनगर, गौळ, पानशेवडी, मसलगा, गोणार, देवईचीवाडी, वरवंट, मरशिवनी, कल्हाळी, उदातांडा, कळका.या दर्शविलेल्या दिनांकाच्या दिवशीग्रामपंचायत सदस्य आरक्षण सोडत होणार आहे. तरी ग्रामपंचायत अंतर्गतच्या सर्व नागरिकांनी वेळेवर उपस्थित राहून, आरक्षण सोडत कार्यक्रमास सहकार्य करावे, असे आवाहन तहसीलदार रामेश्वर गोरे यांनी केले आहे.

# जागतिक पर्यावरण दिनानिमित्त रोपवाटिकेत वृक्ष लागवड

किनवट/प्रतिनिधी- जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून किनवट प्रादेशिक आणि सामाजिक वनीकरण विभागाच्या वतीने बेंदी येथील रोपवाटिकेत वृक्षलागवड केली. ५ जून रोजी बेंदी येथील शाळेतील विद्यार्थींना वृक्ष लागवड आणि पर्यावरण विषयक मार्गदर्शन करण्यात आले. शाळकरी मुलांसह नागरिकांचा स्वयंस्फूर्त उपस्थितीत जाणवली. वनअधिकारी-कर्मचाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली हा दिवस मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

हा कार्यक्रम उपवन संरक्षक मनीषा पाटील, सहायक वनसंरक्षक (जकास व कॅम्पा) किनवट किरण चव्हाण, वनपरिक्षेत्र अधिकारी (प्रादेशिक) धीरज मदने आणि सामाजिक वनीकरण विभागाचे वनपरिक्षेत्र अधिकारी एस.एच. संघई यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली संपन्न झाला. कार्यक्रमादरम्यान उपस्थित अधिकाऱ्यांनी शाळकरी विद्यार्थ्यांना पर्यावरणाचे महत्त्व पटवून दिले. केवळ वृक्षलागवड करणे पुरेसे नसून, लावलेल्या झाडांचे संवर्धन आणि जतन करणे ही काळाची गरज असल्याचे त्यांनी सांगितले. प्लास्टिकचा वापर टाळणे, पाण्याचा अपव्यय रोखणे आणि निसर्गाचा समतोल राखण्यासाठी प्रत्येकाने किमान एक तरी झाड लावून ते जगवण्याचे आवाहन करण्यात आले. या पर्यावरण पूरक उपक्रमाला यशस्वी करण्यासाठी वनविभागाच्या सर्व कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले. यावेळी वनपाल दिनकर सूर्यवंशी, टी.ए.देवकते, बी.टी.जाधव, संजय कोम्पलवार. वनरक्षक गित्ते, बालाजी भुरके, बालाजी



झंपलवाड, सुनील खामकर, रवी दांडेगावकर, केशव वानोळे, विठ्ठल मुळे, महेश भोरडे, ओम शिंदे. वाहन चालक अनिल लाखाडे, अंकुश राठोड, वेद राठोड या सर्व कर्मचाऱ्यांसह किनवट प्रादेशिक व सामाजिक वनीकरण विभागाचे कर्मचारी, शिक्षक आणि शाळकरी मुले या कार्यक्रमात सहभागी झाली होती. रोपवाटिका परिसरात विविध प्रजातींच्या वृक्षांची लागवड करून सर्वांनी पर्यावरण रक्षणाची शपथ घेतली.

**प्रिय मित्र व सहकारी फारुख अहमद,**
**नांदेड.**
**क्रांतिकारी सलाम!**

मित्रा, आज तुझ्या मुसलमानों का सियासी अजेंडा या पहिल्या पुस्तकावर परिसंवाद आयोजित होत आहे. या महत्त्वपूर्ण प्रसंगी तुला मनःपूर्वक हार्दिक शुभेच्छा!



मी तुझे पुस्तक चाळले आणि त्यातील काही प्रकरणे सखोलपणे वाचली. त्यातून एक गोष्ट प्रकर्षाने जाणवली. राजकारणापासून, म्हणजेच सामूहिक कृतीपासून दूर राहणे, हे कोणत्याही शोषित आणि वंचित समाजासाठी किती घातक ठरू शकते. ए शेख, अपनी अपनी देख हा विचार किती योजनाबद्ध आणि कपटपूर्ण पद्धतीने समाजात रुजविण्याचा प्रयत्न प्रस्थापित राजकारण्यांनी केला, याची जाणीव तुझे लेखन करून देते.मित्रा, गेल्या पंधरा-वीस वर्षांतील चळवळीच्या प्रवासात आपला सहवास लाभला. अनेकदा मतभेद झाले, कधी मी तुझ्यावर रागावलोही असेन; पण तुझ्याबद्दलचे प्रेम आणि जिव्हाळा मात्र कधी कमी झाला नाही. कारण आपल्या दोघांची नाळ उपेक्षित, शोषित आणि संघर्षशील समाजाच्या चळवळीशी जोडलेली आहे.

अनिसच्या कार्यातून, पत्रकारितेतून, कष्टकरी संघटनांमधील तुझ्या सहभागातून मला नेहमी भावलेला तू एक कॉम्रेड आहेस. आज तू एका राजकीय पक्षाचा प्रवक्ता आणि नेता आहेस; परंतु तुझी वैचारिक बांधिलकी अजूनही उपेक्षित आणि शोषित समूहांशीच आहे, ही बाब माझ्या दृष्टीने सर्वाधिक महत्त्वाची आहे. तू एखाद्या प्रस्थापित सत्ताधारी प्रवाहात वाहून गेला असतास, तर असे आत्मपरीक्षण घडवणारे आणि समाजाला विचार करायला भाग पाडणारे पुस्तक लिहिले गेले नसते. म्हणूनच तू आम्हाला आजही आमच्या छावणीतील धगधगता निखारा वाटतोस.कॉम्रेड गोविंद पानसरे यांच्याविषयी तू नेहमीच आत्मीयतेने आणि आदराने बोलतोस. त्यांची वैचारिक परंपरा आणि सामाजिक बांधिलकी यांनीच आमच्या पिढीला आकार दिला आहे. यश आणि अपयश ही योद्ध्यांची ओळख असते; संघर्ष करणाऱ्यांनाच त्यांचा सामना करावा लागतो.

क्रांतीची भाषा ही समाजातील केवळ वांझोट्या आक्रोशाची भाषा नसते; ती पर्यायी नीतीची, परिवर्तनाच्या दिशेने दृढ विश्वासाने वाटचाल करणाऱ्या विचारांची भाषा असते. हा विश्वास तू आजही जपतोस, असे आम्हाला वाटते.व्यक्तिकेंद्री राजकारणाचे परिणाम आपण आजूबाजूला पाहत आहोत. भाजपा, काँग्रेस, दोन्ही सेना, दोन्ही राष्ट्रवादी, तसेच सत्तेसाठी सातत्याने रंग आणि भूमिका बदलणारे अनेक प्रादेशिक पक्षया सर्वांच्या राजकारणातून व्यक्तिपूजेची मर्यादा आणि त्याचे दुष्परिणाम स्पष्टपणे दिसतात.या साऱ्या गोंधळातही तू घेत असलेली वेगळी, ठाम आणि विचारप्रधान भूमिका उठून दिसते. ती पाहून तुझ्याविषयी अभिमान वाटतो. मला अजूनही आठवते.नांदेडमध्ये तू आग्रहाने मला Kaala हा चित्रपट दाखवायला नेले होतेस. त्या चित्रपटाच्या अखेरीस लाल आणि निळ्या रंगांची उधळण होत असताना दिलेला संदेशसामाजिक न्याय, समता आणि परिवर्तनाच्या राजकारणाचाच खरा पर्याय असू शकतोतो आपल्या मनावर कायमचा कोरला गेला. त्या स्वप्नाला आणि त्या विचाराला तू पुढे नेशील, असा विश्वास वाटतो.मित्रा, आजच्या या आनंदाच्या आणि अभिमानाच्या क्षणी तुला पुन्हा एकदा मनःपूर्वक शुभेच्छा. तुझे लेखन, तुझा विचार आणि तुझा संघर्ष समाजाला नवी दिशा देत राहो, हीच सदिच्छा.

क्रांतिकारी शुभेच्छांसह,

**रेणके परिवार**

सायंदैनिक नांदेड वार्ता
* संपर्क कार्यालय *
व्ही.डी.देशपांडे भवन, सोमेश कम्पाऊंड, मिलगेट जवळ, नांदेड-१
**मुख्यसंपादक**-प्रदीप नागापूरकर,भ्रमणध्वनी ९४२२१७४७७४,
**सहसंपादक**-अविनाश पाटील, भ्रमणध्वनी ९४२१९९०८८८
E-mail: nandedwarta@mail.com

# भेसळखोरांवर कारवाई की, केवळ आकडेवारीचा खेळ?;मोठे मासे मोकाट,छोट्यांवरच धडक

माहूर/प्रतिनिधी-राज्याचे अन्न व औषध प्रशासन आयुक्त म्हणून आयएएस अधिकारी तुकाराम मुंढे यांची नियुक्ती झाल्यानंतर संपूर्ण राज्यात भेसळखोरांविरोधात मोहीम उघडल्याचे चित्र निर्माण झाले आहे. दूध, तूप, खवा, खाद्यतेल आणि विविध खाद्य पदार्थांमधील भेसळी विरोधात कारवाईचा सपाटा लावण्यात आला. याच श्रखलेत नांदेड जिल्ह्यातील अन्न व औषध प्रशासनाच्या काही कार्यवाह्या झाल्या मात्र या कारवायां-बाबत आता प्रश्नचिन्ह उपस्थित होऊ लागले आहे.

नांदेड जिल्ह्यात गुटखा, खाद्यतेल, दुग्धजन्य पदार्थांसह लाखो रुपयांचा साठा जप्त केल्याचे सांगत अन्न व औषध प्रशासनाने प्रसिद्धी मिळविली. परंतु या कारवाया खरोखरच भेसळखोरांवर आहेत की केवळ आकडेवारी आणि प्रसिद्धीसाठी राबविलेल्या मोहिमा आहेत, अशी चर्चा सर्वत्र रंगली आहे. विशेष म्हणजे माहूर येथील महिला सामाजिक कार्यकर्त्यांच्या लेखी तक्रारीची दखल न घेणाऱ्या बिभागाला आयुक्तपदी मुंढे आल्यानंतरच विभागाला अचानक जाग कशी आली, हा प्रश्नही उपस्थित होत आहे.

अन्न सुरक्षा अधिकारी संतोष कनकावाड, ऋषिकेश मरेवार, अनिकेत भिसे, अरुण तम्मडवार, अ.नं. गिरी, शिल्पा श्रीरामे, अमृता दुधाटे व बालाजी सोनटक्के यांच्या पथकाने नांदेड जिल्ह्यात विविध ठिकाणी धाडसत्र राबविले. मात्र या कारवायांमध्ये प्रत्येक परिसरातून एखादा व्यापारी किंवा छोटा व्यावसायिक निवडून त्याच्यावरच कारवाई करण्यात आल्याची चर्चा जोर धरत आहे.



नांदेडच्या जुना मोंढा परिसरासह धनेगाव, माहूर, हदगाव, देगलूर, इस्लापूर, किनवट आदी भागांत एक-दोन कारवाया करून विभागाने स्वतःला ऍक्टिव्ह दाखविण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप होत आहे. विशेष म्हणजे परदेशी आईस्क्रीम विक्रेते, पानटपरी चालक आणि हातावर पोट असलेल्या छोट्या व्यावसायिकांवर धडक कारवाई करण्यात आली; मात्र मोठ्या प्रमाणात भेसळ करून बाजारपेठेवर वर्चस्व गाजविणारे तथाकथित मोठे मासे अद्यापही प्रशासनाच्या जाळ्यात का? अडकत नाहीत, असा संतप्त सवाल नागरिक विचारत आहेत. भेसळीचे जाळे उघड करायचे असेल तर कारवाईचा फोकस छोट्या व्यावसायिकांवर नव्हे, तर मोठ्या उत्पादक, वितरक आणि संगनमताने चालणाऱ्या रॅकेटवर असायला हवा. अन्यथा ही मोहीम केवळ प्रसिद्धीपुरती आणि आकडेवारी वाढविण्यासाठी असल्याचा संशय अधिक गडद होणार आहे.भेसळमुक्ती चा नारा देणाऱ्या प्रशासनाने आता छोट्यांवर कारवाई करून वाहवा मिळविण्याऐवजी मोठ्या भेसळखोरांच्या मुसक्या आवळण्याचे धाडस दाखवावे, अशी मागणी सर्वसामान्य नागरिकांतून होत आहे.

माहूर शहरात व वाई बाजार परिसरात गुटखा विक्री करणाऱ्या माफियानी डोके वर काढले आहे. सिंदखेडचे सहाय्यक पोलीस निरीक्षक रमेश जाधवर यांच्या बदली नतंर गुटखा विक्रेते बेलगाम झाले असून दुचाकी चारचाकी वर गुटखा छोट्या गावात पोहच केला जातं आहे. विदर्भातील फुलसावंगी, व तेलंगनाच्या आदिलाबाद आणि नांदेड जिल्ह्यातील हिमायतनगर मधून गुटखा माहूर व वाई बाजारला येत असल्याची माहिती मिळाली आहे. मात्र संबंधित विभागाची या कडे अर्थ पूर्ण डोळे झाक तर नाही ना असा प्रश्न उपास्थतीत होत आहे. करण अन्न सुरक्षा विभागाने माहूर मध्ये केवळ किराणा दुकानातील सेम्पल उचलून शंकेला जागा दिली आहे.

## एमपीडीए गुन्ह्यातील आरोपीस अटक

नांदेड/प्रतिनिधी-एमपीडीए गुन्ह्यातील फरार आरोपीस स्थानिक गुन्हा अन्वेषण विभागाच्या पोलीसांनी शुक्रवारी दुथ डेअरी परिसरातून अटक केली आहे.

सराईत गुन्हेगार सागर सुनिल पवळे (वय २१) रा. बळीरामपूर,नांदेड हा अनेक गुन्ह्यात फरार होता. प्रशासनाने त्याच्या विरुध्द एमपीडीए अंतर्गत कारवाई करण्याचे निर्देश दिले होते. शुक्रवारी शासकीय दुधडेअरी जवळ स्थानिक गुन्हा अन्वेषण विभागाच्या पोलीसांनी सापळा रचून सुनिल पवळे यास अटक केली आहे.

# टीईटी-सीटीईटीची सक्ती कायम;शिक्षकांमध्ये धास्ती

देगलूर/प्रतिनिधी-शाळा मधील शिक्षकांना टीईटी-सीटीईटी परीक्षेतून सूट मिळेल, या अपेक्षेला सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयामुळे मोठा धक्का बसला आहे. न्यायालयाने शिक्षकांना परीक्षेतून कोणतीही सूट न देता केवळ मुदतवाढ दिले असून, आता टीईटी अथवा सीटीईटी परीक्षा उत्तीर्ण होण्यासाठी ३१ ऑगस्ट २०२८ ही अंतिम मुद्दत निश्चित करण्यात आली आहे. यामुळे देगलूर तालुक्यात सह राज्यातील हजारो शिक्षकांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे.

यापूर्वी अंतिम मुद्दत ३१ ऑगस्ट २०२७ होती. विविध शिक्षक संघटनांनी सेवेत असलेल्या शिक्षकांना टीईटी-सीटीईटी मधून वगळण्याची मागणी केली होती. मात्र न्यायालयाने ती मान्य न करता केवळ एक वर्षाची मुदतवाढ दिली आहे. त्यामुळे शिक्षक, मुख्याध्यापक आणि केंद्रप्रमुखांसाठी परीक्षा उत्तीर्ण होणे बंधनकारक राहणार आहे. सध्या शाळामधील पटसंख्या वाढविणे, विद्यार्थ्यांची नोंदणी, विविध शासकीय सर्वेक्षणे आणि जनगणनेची कामे यामुळे शिक्षक आधीच व्यस्त आहेत. अशा परिस्थितीत अभ्यासासाठी वेळ काढणे अनेकांसाठी आव्हान ठरत आहे. विशेषता; वयाच्या पन्नाशीत असलेल्या शिक्षकांना पुन्हा परीक्षेची तयारी करावी लागणार असल्याने मानसिक ताण वाढला आहे.याशिवाय अनेक शिक्षकांनी घरबांधणी, मुलांच्या शिक्षणासाठी किँवा इतर कारणासाठी बँकांकडून कर्ज घेतले आहे. मुदतीपर्यंत परीक्षा उत्तीर्ण न झाल्यास नोकरीवर परिणाम होण्याची शक्यता व्यक्त होत असल्याने कर्जफेडीचे भवितव्य काय, यांचीही चिंता शिक्षकांना सतावत आहे. दरम्यान ३१ ऑगस्ट २०२८ नंतर परीक्षा उत्तीर्ण झालेल्या शिक्षकांवर नेमकी कोणती कारवाई होणार, याबाबत शासनाने अद्याप स्पष्ट भूमिका जाहीर केलेली नाही.

# शेतातील हातभट्टीच्या दारु अड्ड्यावर पोलीसांची धाड

माहूर/प्रतिनिधी-तालुक्यातील मौजे पापलवाडी येथे शेतातील टीनशेडमध्ये मोठ्या प्रमाणावर हातभट्टीची दारू तयार करण्यासाठी रसायन साठवून ठेवण्यात आल्याची गोपनीय माहिती पोलिसांना मिळाल्यानंतर ५ जून रोजी धाड टाकण्यात आली. या कारवाईत हातभट्टीचा अड्डा उद्ध्वस्त करण्यात आला असून सुमारे २५ हजार रुपयांचा मुद्देमाल नष्ट करण्यात आला. या कारवाईमुळे अवैध दारू व्यवसाय करणाऱ्यांचे धाबे दणाणले आहेत.

पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप व पोलीस अधीक्षक अविनाश कुमार यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू असलेल्या ऑपरेशन फ्लॅश आऊट मोहिमेअंतर्गत हातभट्टी दारू निर्मिती करणाऱ्यांविरोधात कठोर कारवाई करण्यात येत आहे. यापूर्वीही माहूर तालुक्यात अवैध दारू निर्मितीविरोधात व्यापक मोहीम राबविण्यात आली होती. तसेच वारंवार गुन्हे करणाऱ्यांविरोधात तडीपारीचे प्रस्ताव तयार



करण्याचे काम सुरू असल्याची माहिती पोलीस निरीक्षक देविदास चोपडे यांनी दिली. पापलवाडी येथील शेतातील गोठ्यात पोलीस निरीक्षक देविदास चोपडे यांच्या नेतृत्वाखाली पोहेका ज्ञानोबा खंदाडे, पोहेका गोपानवाड व त्यांच्या सहकाऱ्यांनी छापा टाकला. यावेळी पाच टाक्यांमध्ये साठवून ठेवलेले मोहफुलापासून तयार करण्यात आलेले रसायन जप्त करून नष्ट करण्यात आले. या प्रकरणी एका व्यक्तीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# मौजे शिवणी येथे अडीच लाखाचा गुटखा जप्त

नांदेड/प्रतिनिधी-मौजे शिवणी ता.किनवट येथील बोलेरो पिकअप वाहनातून अन्न व औषध प्रशासन विभागाच्या अधिकाऱ्यांनी अडीच लाख रुपये किंमतीचा शासनाने प्रतिबंधीत केलेला गुटखा जप्त केला आहे.

मौजे शिवणी येथे गुटख्याची सर्रास विक्री होत असल्याची माहिती अन्न औषध प्रशासन विभागाच्या अधिकाऱ्यांना मिळाली. शुक्रवार दि.५ जून रोजी अन्न औषध प्रशासन विभागाचे अधिकारी पोलीस कर्मचाऱ्यासह मौजे शिवणी गावात दाखल झाले. गावातील जनता किराणा स्टोअर्स या दुकाना समोर संशयास्पदरित्या उभ्या असलेल्या बोलेरो पिकअप वाहनाची तपासणी करण्यात आली. सदरील वाहनामध्ये शासनाने बंदी घातलेल्या विविध कंपनीचा अडीच लाख रुपयांचा गुटखा पोलीसांना आढळून आला आहे. सदरील गुटखा जप्त करण्यात आला आहे. अन्न सुरक्षा अधिकारी अविनाश गिरी यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन इस्लापूर पोलीस ठाण्यात अज्ञात इसमा विरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. शिवणी गावात यापूर्वीही पोलीसांनी गुटख्याचा साठा जप्त केला होता.

# खा.रवींद्र चव्हाण यांची जांब बु.येथील प्राथमिक आरोग्य केंद्रास भेट

मुखेड/प्रतिनिधी-प्राथमिक आरोग्य केंद्र जांब बु. येथे नांदेड जिल्ह्याचे खा. रवींद्र चव्हाण यांनी अचानक भेट देऊन आरोग्य सेवेची पाहणी केली. रुग्णांना मिळणाऱ्या सुविधा, औषधांचा साठा, कर्मचारी उपस्थिती तसेच दैनंदिन कामकाजाचा सविस्तर आढावा घेतला.

यावेळी विविध सुविधांमधील त्रुटी व अडचणींबाबत संबंधित अधिकाऱ्यांना जाब विचारत आवश्यक सुविधा तात्काळ उपलब्ध करून देण्याचे निर्देश दिले. ग्रामीण भागातील नागरिकांना उपचारासाठी जिल्हा मुख्यालयाकडे धाव घ्यावी लागू नये, आरोग्याच्या सर्व मूलभूत सुविधा गावपातळीवर उपलब्ध झाल्या पाहिजेत असे स्पष्ट मत खासदार चव्हाण यांनी व्यक्त केले. अचानक भेटीमुळे आरोग्य केंद्रातील डॉक्टर, कर्मचारी व प्रशासनाची चांगलीच तारांबळ उडाली. ग्रामीण जनतेच्या आरोग्याशी तडजोड खपवून घेतली जाणार नाही, असा स्पष्ट इशाराही खा. रवींद्र चव्हाण यांनी यावेळी दिला. यावेळी त्यांच्या समवेत माजी सभापती बळवंत पाटील बेटमोगरेकर व अन्य प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते.

**तालुका दंडाधिकारी तथा तहसीलदार कंधार यांचे कार्यालय**

Email Id:tahkadhar@gmail.com जा.क्रं.२०२६/ज.मृ.नों./कावी
दुरध्वनी क्र.२२३ ०२४६६ दिनांक-०४/०६/२०२६

**(जन्म मृत्यू शाखा)**

**जाहीर प्रगटन**

याद्वारे प्रगटन देण्यात येते की अर्जदार उमेश जयराम वडजे रा. आंबुलगा ता.कंधार जि.नांदेड यांनी या कार्यालयात त्यांचा उमेश जयराम वडजे रा.आंबुलगा ता.कंधार जि.नांदेड यांचे जन्म/मृत्यू प्रमाणपत्र मिळण्यासाठी आदेश होण्याकरिता मागणी केली आहे.

जन्म /मृत्यू झालेल्यांचे नाव उमेश जयराम वडजे रा.आंबुलगा ता.कंधार या ठिकाणी दिनांक ०१/०४/१९७७ या दिवशी जन्म/मृत्यू झाला असून प्रमाणपत्र मिळण्याकरिता आदेश होणे करिता सदर तहसील कार्यालय कंधार येथे दिनांक २१/०५/२०२६ रोजी अर्ज सादर केला आहे.

वरील जन्म /मृत्यू दिनांकाबाबत कोणाचा आक्षेप असल्यास हे प्रगटन प्रसिद्ध झालेपासून पंधरा (१५) दिवसाच्या आत आपला लेखी आक्षेप तहसील कार्यालय कंधार येथे सादर करावा. दिलेल्या मुदतीनंतर आक्षेपाचा विचार केला जाणार नाही.

दिनांक :-०४/०६/२०२६
स्थळ - कंधार
स्वाक्षरित/-
तहसीलदार कंधार

**तालुका दंडाधिकारी तथा तहसीलदार कंधार यांचे कार्यालय**

Email Id:tahkadhar@gmail.com जा.क्रं.२०२६/ज.मृ.नों./कावी
दुरध्वनी क्र.२२३ ०२४६६ दिनांक-०४/०६/२०२६

**(जन्म मृत्यू शाखा)**

**जाहीर प्रगटन**

याद्वारे प्रगटन देण्यात येते की अर्जदार अखिल नबीसाब निचलकर रा.फुलवळ ता.कंधार जि.नांदेड यांनी या कार्यालयात त्यांचा नगमा अखिल निचलकर रा.फुलवळ ता.कंधार जि.नांदेड यांचे जन्म/मृत्यू प्रमाणपत्र मिळण्यासाठी आदेश होण्याकरिता मागणी केली आहे.

जन्म /मृत्यू झालेल्यांचे नाव नगमा अखिल निचलकर रा.फुलवळ ता.कंधार या ठिकाणी दिनांक २०/०९/२०१५ या दिवशी जन्म/मृत्यू झाला असून प्रमाणपत्र मिळण्याकरिता आदेश होणे करिता सदर तहसील कार्यालय कंधार येथे दिनांक २१/०५/२०२६ रोजी अर्ज सादर केला आहे.

वरील जन्म /मृत्यू दिनांकाबाबत कोणाचा आक्षेप असल्यास हे प्रगटन प्रसिद्ध झालेपासून पंधरा (१५) दिवसाच्या आत आपला लेखी आक्षेप तहसील कार्यालय कंधार येथे सादर करावा. दिलेल्या मुदतीनंतर आक्षेपाचा विचार केला जाणार नाही.

दिनांक :-०४/०६/२०२६
स्थळ - कंधार
स्वाक्षरित/-
तहसीलदार कंधार

**तालुका दंडाधिकारी तथा तहसीलदार कंधार यांचे कार्यालय**

Email Id:tahkadhar@gmail.com जा.क्रं.२०२६/ज.मृ.नों./कावी
दुरध्वनी क्र.२२३ ०२४६६ दिनांक-०४/०६/२०२६

**(जन्म मृत्यू शाखा)**

**जाहीर प्रगटन**

याद्वारे प्रगटन देण्यात येते की अर्जदार धनश्री विठलराव बस्वदे रा.काटकळंबा ता.कंधार जि.नांदेड यांनी या कार्यालयात त्यांचा धनश्री विठलराव बस्वदे रा.काटकळंबा ता.कंधार जि.नांदेड यांचे जन्म/मृत्यू प्रमाणपत्र मिळण्यासाठी आदेश होण्याकरिता मागणी केली आहे.

जन्म /मृत्यू झालेल्यांचे नाव धनश्री विठलराव बस्वदे रा.काटकळंबा ता.कंधार या ठिकाणी दिनांक ०८/०६/२००३ या दिवशी जन्म/मृत्यू झाला असून प्रमाणपत्र मिळण्याकरिता आदेश होणे करिता सदर तहसील कार्यालय कंधार येथे दिनांक ०१/०६/२०२६ रोजी अर्ज सादर केला आहे.

वरील जन्म /मृत्यू दिनांकाबाबत कोणाचा आक्षेप असल्यास हे प्रगटन प्रसिद्ध झालेपासून पंधरा (१५) दिवसाच्या आत आपला लेखी आक्षेप तहसील कार्यालय कंधार येथे सादर करावा. दिलेल्या मुदतीनंतर आक्षेपाचा विचार केला जाणार नाही.

दिनांक :-०४/०६/२०२६
स्थळ - कंधार
स्वाक्षरित/-
तहसीलदार कंधार

**तालुका दंडाधिकारी तथा तहसीलदार कंधार यांचे कार्यालय**

Email Id:tahkadhar@gmail.com जा.क्रं.२०२६/ज.मृ.नों./कावी
दुरध्वनी क्र.२२३ ०२४६६ दिनांक-०४/०६/२०२६

**(जन्म मृत्यू शाखा)**

**जाहीर प्रगटन**

याद्वारे प्रगटन देण्यात येते की अर्जदार तातेराव धोंडीबा चव्हाण रा.पोमातांडा ता.कंधार जि.नांदेड यांनी या कार्यालयात त्यांचा चंदन तातेराव चव्हाण रा.पोमातांडा ता.कंधार जि.नांदेड यांचे जन्म/मृत्यू प्रमाणपत्र मिळण्यासाठी आदेश होण्याकरिता मागणी केली आहे.

जन्म /मृत्यू झालेल्यांचे नाव चंदन तातेराव चव्हाण रा.पोमातांडा ता.कंधार या ठिकाणी दिनांक ०१/०१/२०१० या दिवशी जन्म/मृत्यू झाला असून प्रमाणपत्र मिळण्याकरिता आदेश होणे करिता सदर तहसील कार्यालय कंधार येथे दिनांक २६/०५/२०२६ रोजी अर्ज सादर केला आहे.

वरील जन्म /मृत्यू दिनांकाबाबत कोणाचा आक्षेप असल्यास हे प्रगटन प्रसिद्ध झालेपासून पंधरा (१५) दिवसाच्या आत आपला लेखी आक्षेप तहसील कार्यालय कंधार येथे सादर करावा. दिलेल्या मुदतीनंतर आक्षेपाचा विचार केला जाणार नाही.

दिनांक :-०४/०६/२०२६
स्थळ - कंधार
स्वाक्षरित/-
तहसीलदार कंधार

**तालुका दंडाधिकारी तथा तहसीलदार कंधार यांचे कार्यालय**

Email Id:tahkadhar@gmail.com जा.क्रं.२०२६/ज.मृ.नों./कावी
दुरध्वनी क्र.२२३ ०२४६६ दिनांक ०४/०६/२०२६

**(जन्म मृत्यू शाखा)**

**जाहीर प्रगटन**

याद्वारे प्रगटन देण्यात येते की अर्जदार श्री.जलाल मैनोदिन कासार रा. कुरुळा ता.कंधार जि. नांदेड यांनी या कार्यालयात त्यांचा श्री. जलाल मैनोदिन कासार रा.कुरुळा ता.कंधार जि.नांदेड यांचे जन्म/मृत्यू प्रमाणपत्र मिळण्यासाठी आदेश होण्याकरिता मागणी केली आहे.

जन्म /मृत्यू झालेल्यांचे नाव जलाल मैनोदिन कासार रा.कुरुळा ता.कंधार या ठिकाणी दिनांक २१/०३/१९६५ या दिवशी जन्म/मृत्यू झाला असून प्रमाणपत्र मिळण्याकरिता आदेश होणे करिता सदर तहसील कार्यालय कंधार येथे दिनांक २१/०५/२०२६ रोजी अर्ज सादर केला आहे.

वरील जन्म /मृत्यू दिनांकाबाबत कोणाचा आक्षेप असल्यास हे प्रगटन प्रसिद्ध झालेपासून पंधरा (१५) दिवसाच्या आत आपला लेखी आक्षेप तहसील कार्यालय कंधार येथे सादर करावा. दिलेल्या मुदतीनंतर आक्षेपाचा विचार केला जाणार नाही.

दिनांक :-०४/०६/२०२६
स्थळ - कंधार
स्वाक्षरित/-
तहसीलदार कंधार

**तालुका दंडाधिकारी तथा तहसीलदार कंधार यांचे कार्यालय**

Email Id:tahkadhar@gmail.com जा.क्रं.२०२६/ज.मृ.नों./कावी
दुरध्वनी क्र.२२३ ०२४६६ दिनांक ०४/०६/२०२६

**(जन्म मृत्यू शाखा)**

**जाहीर प्रगटन**

याद्वारे प्रगटन देण्यात येते की अर्जदार श्री.जलाल मैनोदिन कासार रा. कुरुळा ता.कंधार जि. नांदेड यांनी या कार्यालयात त्यांचा श्री. शेख सिदीकी जलाल रा.कुरुळा ता.कंधार जि.नांदेड यांचे जन्म/मृत्यू प्रमाणपत्र मिळण्यासाठी आदेश होण्याकरिता मागणी केली आहे.

जन्म /मृत्यू झालेल्यांचे नाव शेख सिदीकी जलाल रा.कुरुळा ता.कंधार या ठिकाणी दिनांक १०/१२/१९९६ या दिवशी जन्म/मृत्यू झाला असून प्रमाणपत्र मिळण्याकरिता आदेश होणे करिता सदर तहसील कार्यालय कंधार येथे दिनांक २१/०५/२०२६ रोजी अर्ज सादर केला आहे.

वरील जन्म /मृत्यू दिनांकाबाबत कोणाचा आक्षेप असल्यास हे प्रगटन प्रसिद्ध झालेपासून पंधरा (१५) दिवसाच्या आत आपला लेखी आक्षेप तहसील कार्यालय कंधार येथे सादर करावा. दिलेल्या मुदतीनंतर आक्षेपाचा विचार केला जाणार नाही.

दिनांक :-०४/०६/२०२६
स्थळ - कंधार
स्वाक्षरित/-
तहसीलदार कंधार

**तालुका दंडाधिकारी तथा तहसीलदार कंधार यांचे कार्यालय**

Email Id:tahkadhar@gmail.com जा.क्रं.२०२६/ज.मृ.नों./कावी
दुरध्वनी क्र.२२३ ०२४६६ दिनांक-१३/०५/२०२६

**(जन्म मृत्यू शाखा)**

**जाहीर प्रगटन**

याद्वारे प्रगटन देण्यात येते की अर्जदार खुरेशी मुस्तकिन अहेमद रा. विजयगड कंधार ता.कंधार जि.नांदेड यांनी या कार्यालयात त्यांचा खुरेशी मुस्तकिन अहेमद रा.विजयगड कंधार ता.कंधार जि.नांदेड यांचे जन्म/मृत्यू प्रमाणपत्र मिळण्यासाठी आदेश होण्याकरिता मागणी केली आहे.

जन्म /मृत्यू झालेल्यांचे नाव खुरेशी मुस्तकिन अहेमद रा.विजयगड कंधार ता.कंधार या ठिकाणी दिनांक ०५/०९/२००३ या दिवशी जन्म/मृत्यू झाला असून प्रमाणपत्र मिळण्याकरिता आदेश होणे करिता सदर तहसील कार्यालय कंधार येथे दिनांक ०५/०५/२०२६ रोजी अर्ज सादर केला आहे.

वरील जन्म /मृत्यू दिनांकाबाबत कोणाचा आक्षेप असल्यास हे प्रगटन प्रसिद्ध झालेपासून पंधरा (१५) दिवसाच्या आत आपला लेखी आक्षेप तहसील कार्यालय कंधार येथे सादर करावा. दिलेल्या मुदतीनंतर आक्षेपाचा विचार केला जाणार नाही.

दिनांक :-१३/०५/२०२६
स्थळ - कंधार
स्वाक्षरित/-
तहसीलदार कंधार

**तालुका दंडाधिकारी तथा तहसीलदार कंधार यांचे कार्यालय**

Email Id:tahkadhar@gmail.com जा.क्रं.२०२६/ज.मृ.नों./कावी
दुरध्वनी क्र.२२३ ०२४६६ दिनांक-०४/०६/२०२६

**(जन्म मृत्यू शाखा)**

**जाहीर प्रगटन**

याद्वारे प्रगटन देण्यात येते की अर्जदार श्रध्दा सुनिल शेंबाळे रा. फुलवळ ता.कंधार जि.नांदेड यांनी या कार्यालयात त्यांचा श्रद्धा सुनिल शेंबाळे रा.फुलवळ ता.कंधार जि.नांदेड यांचे जन्म/मृत्यू प्रमाणपत्र मिळण्यासाठी आदेश होण्याकरिता मागणी केली आहे.

जन्म /मृत्यू झालेल्यांचे नाव श्रद्धा सुनिल शेंबाळे रा.फुलवळ ता.कंधार या ठिकाणी दिनांक ०६/०९/२००७ या दिवशी जन्म/मृत्यू झाला असून प्रमाणपत्र मिळण्याकरिता आदेश होणे करिता सदर तहसील कार्यालय कंधार येथे दिनांक २१/०५/२०२६ रोजी अर्ज सादर केला आहे.

वरील जन्म /मृत्यू दिनांकाबाबत कोणाचा आक्षेप असल्यास हे प्रगटन प्रसिद्ध झालेपासून पंधरा (१५) दिवसाच्या आत आपला लेखी आक्षेप तहसील कार्यालय कंधार येथे सादर करावा. दिलेल्या मुदतीनंतर आक्षेपाचा विचार केला जाणार नाही.

दिनांक :-०४/०६/२०२६
स्थळ - कंधार
स्वाक्षरित/-
तहसीलदार कंधार

# किनवटमध्ये वारंवार वीज खंडित; महावितरण विरोधात संताप

## नगराध्यक्षा एंड्रलवार यांनी केली चौकशीची मागणी

किनवट/प्रतिनिधी- महावितरणकडून दर गुरुवारी दुरुस्ती व देखभालीच्या नावाखाली 'मेंटेनन्स डे' पाळला जाऊन दुरुस्तीची कामे केली जातात. दर आठवड्याला मेंटेनन्स केल्यानंतर पुन्हा पुन्हा वीज खंडित का होते? असा संतप्त सवाल करून कायमस्वरूपी उपाययोजना कराव्यात अशा मागणीचे निवेदन नगराध्यक्षा सौ.सुजाता एंड्रलवार यांनी उपविभागीय अभियंता नामदेव केंद्रे यांना दिले. वीजेवर अवलंबून असलेल्या धंद्यांवर त्याचा अनिष्ट परिणाम तर होतोच शिवाय शहराच्या विकासाला सुद्धा खिळ बसत असल्याने नगराध्यक्षांनी वीज खंडित प्रकरण गांभीर्याने घेतले आहे.

केंद्र व राज्य शासनाकडून वीज सुधारणेसाठी विविध योजनांमधून निधी दिला जातो. मात्र, विद्युत विभागाचे कंत्राटदाराकडे मुळीच लक्ष नसल्याने विकास योजनांची कामे प्रत्यक्षात न करता केवळ कागदोपत्री दाखवून आर्थिक गैरव्यवहार केला जात असल्याचा गंभीर आरोप नगराध्यक्षांनी केला आहे. सध्या पावसाळा तोंडावर आला असून, शहरातील जागोजागी लोंबकळणाऱ्या जुन्या वीज तारा आणि नादुरुस्त रोहित्रांमुळे पावसाळ्याचे चार महिने नागरिकांना नाहक त्रास सहन करावा लागणार आहे. त्यामुळे शहरातील जुने विद्युत खांब, जुन्या तारा आणि जुने रोहित्रे तातडीने बदलून नवीन बसवावेत असे नगराध्यक्षांचे म्हणणे आहे. विद्युत तारांना अडथळा ठरणाऱ्या झाडांच्या फांद्या तात्काळ दूर कराव्यात. दुरुस्ती व साहित्य पुरवठ्याच्या नावाखाली होत असलेल्या आर्थिक गैरव्यवहाराची सखोल चौकशी करून दोषी अधिकारी व कंत्राटदारांवर दाखलपात्र कायदेशीर कारवाई करण्यात यावी अशी मागणी नगराध्यक्षा सौ.एंड्रलवार यांनी केली आहे. याप्रसंगी रोहन एंड्रलवार, शहरप्रमुख तथा नगरसेवक प्रशांत कोरडे, नगरसेवक प्रवीण राठोड नगरसेवक शेखर नेमान्नीवार, नगरसेवक श्रीराम नेम्माणीवार,



प्रभू कोल्हे, निसार भाटी, राजू सातुरवार, शेख मुकद्दर, माजी शहरप्रमुख संतोष येलचलवार, नागेश मंत्रिवार, किशोर बोलेनवार हे उपस्थित होते. निवेदनाच्या प्रती राज्याचे मुख्यमंत्री तथा ऊर्जामंत्री मा.ना. देवेंद्र फडणवीस, पालकमंत्री मा.ना.अतुल सावे, ऊर्जा राज्यमंत्री मा.ना.मेघना दिपक साकोरे बोर्डीकर, ऊर्जा विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव, आणि महावितरणच्या वरिष्ठ अभियंत्यांकडे पुढील कारवाईसाठी रवाना केल्या आहेत. आता महावितरण प्रशासन यावर काय पावले उचलते, याकडे संपूर्ण किनवट-वासीयांचे लक्ष लागले आहे.

## अतिक्रमण न हटवल्यास १५ जूनला मोर्चा

बिलोली/प्रतिनिधी- बिलोली नगर परिषदेच्या मुख्य प्रशासकीय कार्यालय परिसरात लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या नियोजीत पुतळ्याच्या जागेवर झालेले अनधिकृत अतिक्रमण तत्काळ हटवण्यात यावे, अन्यथा येत्या १५ जून रोजी बिलोली शहरात भव्य मोर्चा काढून रास्ता रोको आंदोलन करण्यात येईल, असा इशारा मातंग समाज व नवयुवक साठे मित्रमंडळाच्या वतीने देण्यात आला आहे. या संदर्भातील एक सविस्तर निवेदन ५ जून रोजी जिल्हाधिकारी, नांदेड आणि मुख्याधिकारी नगर परिषद, बिलोली यांना सादर करण्यात आले आहे.

## किनवटमध्ये छत्रपतींच्या राज्याभिषेक दिनाचा जल्लोष

किनवट/प्रतिनिधी-रयतेचे राजे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या राज्याभिषेक दिनानिमित्त आज सकाळी ८ वाजता छत्रपती शिवाजी महाराज चौक, किनवट येथे अभिवादन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. मराठा सेवा संघ व संभाजी ब्रिगेड, किनवट यांच्या वतीने आयोजित या कार्यक्रमाला विविध राजकीय, सामाजिक व सांस्कृतिक संघटनांचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि शिवप्रेमी नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. उपस्थित मान्यवरांनी शिवरायांच्या शौर्य, दूरदृष्टी, लोककल्याणकारी राज्यकारभार आणि स्वराज्याच्या संकल्पनेचा गौरवपूर्ण उल्लेख केला. शिवरायांचे विचार आजही समाजाला प्रेरणा देणारे असून त्यांच्या आदर्शांचे अनुकरण करण्याची गरज असल्याचे वक्त्यांनी सांगितले. कार्यक्रमात जय जिजाऊ, जय शिवराय च्या घोषणांनी परिसर दणाणून गेला. विविध पक्ष, संघटना व सामाजिक क्षेत्रातील प्रतिनिधींनी एकत्र येत शिवरायांप्रती कृतज्ञता व्यक्त केली. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मराठा सेवा संघ व संभाजी ब्रिगेडच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी विशेष परिश्रम घेतले. छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेक दिनानिमित्त आयोजित या कार्यक्रमामुळे किनवट शहरात शिवमय वातावरण निर्माण झाले होते.

# खाजगी वाहनाद्वारे होणाऱ्या अवैध प्रवासी वाहतूकीस प्रतिबंध करावा

## जिल्हा पोलीस अधीक्षकांचे आदेश



भोकर/प्रतिनिधी- शहरातील बसस्थानका समोर खाजगी वाहनाद्वारे होणाऱ्या अवैध प्रवासी वाहतुकीस तात्काळ प्रतिबंध करावा असे आदेश जिल्हा पोलीस प्रमुख अबीनाशकुमार यांनी भोकरसह अन्य पोलीस स्टेशन प्रभारी यांना काढले आहेत.

जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालय नांदेड यांनी भोकर पोलीस स्टेशन प्रभारी यांना दिलेल्या सूचना आदेशामध्ये म्हटले आहे की, विभागीय नियंत्रक राज्य परिवहन नांदेड यांनी त्यांचे वरील संदर्भीय पत्राद्वारे कळविले आहे की नांदेड जिल्ह्यातील भोकर, कंधार, लोहा मुखेड, देगलूर, बिलोली, किनवट, माहूर, हदगाव, अर्धापूर, रामतीर्थ, मांडवी, उमरी, धर्माबाद, या बसस्थानकाच्या नो पार्किंग झोनच्या परिसरातून अवैध वाहतूक होत असल्याचे कळविले आहे. त्यानुसार बसस्थानके व वाहतूक नियंत्रण केंद्र यांच्या २०० मीटर परिसरातून अवैध प्रवासी वाहतूक होऊ नये त्याकरिता मोटर परिवहन विभागाचे सुरक्षारक्षक यांना सोबत घेऊन कायदेशीर कार्यवाही करावी असे आदेश काढले आहेत. मुख्य सुरक्षा व दक्षता अधिकारी पोलीस उपमहा निरीक्षक मुंबई यांनीही ५ जून २०२६ रोजी आदेश काढून सर्व प्रादेशिक व्यवस्थापक यांना सूचना दिल्या आहेत. उच्च न्यायालय औरंगाबाद खंडपीठ यांनी वर्ष २००२ मध्ये अवैध प्रवासी वाहतुकीच्या संदर्भात दिलेल्या निर्णयानुसार रा.प. महामंडळांच्या सर्व बसस्थानकांच्या २०० मीटरच्या आत खाजगी वाहने प्रवासी घेण्यास प्रवासी उतरण्यास मनाई केली आहे. अवैध वाहतूक करण्यास काटेकोरपणे कारवाई करावी ५ जून ते १५ जून या कालावधीत विशेष मोहीम राबवावी असे आदेश काढले आहेत. जिल्हा पोलीस प्रमुखांच्या आदेशानुसार भोकर शहरात बसस्थानकासमोर चालू असलेल्या अवैध प्रवासी वाहतुकीवर कारवाई करण्यासाठी आगार प्रमुख संजय पुंडगे यांच्या मार्गदर्शनानुसार स्थानक प्रमुख साखरे यांनी पोलीस अधिकाऱ्यांना सोबत घेऊन कारवाई सुरू केली आहे. ही कारवाई केवळ मोहिमेपूरती राहू नये शहरातील अवैध वाहतूक नेहमीच बंद करण्यात यावी. डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकात मोठ्या प्रमाणावर खाजगी अवैध वाहतूक होत असून एस.टी. बसला सुद्धा चौकात जागा देण्यात येत नाही. खाजगी वाहतुकीची वाहने त्या ठिकाणी उभा टाकतात त्यामुळे एस.टी.ला मोठी अडचण निर्माण झाली आहे, खाजगी वाहतूक मात्र जोमात सुरू आहे.

# शासकीय डेपोमधील रेती साठयाचा १९ जून रोजी जाहिर लिलाव

नांदेड/प्रतिनिधी- जिल्हाधिकारी यांच्या आदेशानुसार नांदेड तालुक्यातील शासकीय डेपोमधील शिल्लक रेतीसाठयाचा जाहिर लिलाव शुक्रवार १९ जून २०२६ रोजी सकाळी ११ वा. उपविभागीय अधिकारी कार्यालय, चिखलवाडी परिसर नांदेड येथील कार्यालयाचे सभागृह येथे करण्यात येणार आहे. या लिलावात भाग घेण्यास इच्छूक व्यक्तींनी ओळखपत्रासह विहीत तारखेस उपस्थित राहावे, असे आवाहन उपविभागीय अधिकारी डॉ. सचिन खल्लाळ यांनी केले आहे.

नांदेड तालुक्यातील शासकीय रेती डेपोमधील शिल्लक रेतीसाठा पुढीलप्रमाणे आहे. मौ. रहाटी जुने वाघी ता. नांदेड ३८ हजार ७१२ उपलब्ध रेतीसाठा असून हातची किंमत २ हजार ७६७ रुपये आहे. याची हातची किंमत १० कोटी ७१ लाख १६ हजार १०४ रुपये आहे. तर खुपसरवाडी येथे १ हजार ५ उपलब्ध रेतीसाठा असून हातची किंमत प्रति ब्रास २ हजार ७६७ रुपये आहे. तर २७ लाख ८० हजार ८३५ रुपये याप्रमाणे आहे. लिलावाच्या अटी व शर्ती महसूल व वनविभागाचा ८ एप्रिल २०२५ व १५ जुलै २०२५ शासन निर्णयाप्रमाणे राहतील. या जाहिर लिलावाच्या अटी व शर्ती उपविभागीय अधिकारी कार्यालय नांदेड व तहसिल कार्यालय, नांदेड या कार्यालयाच्या नोटीस बोर्डवर लावण्यात आलेल्या आहेत.

# अधिक मासात अनोखे धोंडे दान; रुपयाच्या बंदीवर साकारली जगन्नाथांची प्रतिमा

उमरखेड/प्रतिनिधी- अधिक मासानिमित्त धोंडेदान करण्याची प्राचीन परंपरा आजही श्रद्धेने पाळली जाते. मंदिरात, गुरूंना तसेच जावयांना धोंडेदान देण्याची प्रथा असून या दानामध्ये तांब्याचे दान सर्वोत्तम मानले जाते. याच परंपरेला कलात्मकतेची जोड देत उमरखेड येथील युनिव्हर्सल इंग्लिश मीडियम स्कूलचे कला शिक्षक शिवकांत विनायक धोबे यांनी एक अनोखा उपक्रम राबविला.

धोबे यांनी आपल्या हस्तकौशल्याचा वापर करून एक रुपयाच्या तब्बल ३३ नाण्यांवर रंग आणि कुंचल्याच्या साहाय्याने भगवान जगन्नाथांची आकर्षक प्रतिमा साकारत प्रत्येक नाण्यावर अत्यंत बारकाईने रंगकाम करून भगवान जगन्नाथांची सुंदर कलाकृती चितारुण या नाण्यांची कलात्मक मांडणी करून पारंपरिक धोंडेदानाला एक वेगळीच जोड दिली.अधिक मासाच्या पुण्यपर्वावर तयार केलेली ही अनोखी कलाकृती त्यांनी श्रद्धापूर्वक श्री बालाजी मंदिरात अर्पण केली. धार्मिक भावना, भारतीय संस्कृती आणि कलाविष्कार यांचा सुंदर संगम या उपक्रमातून पाहायला मिळाला.धोबे यांच्या या आगळ्या वेगळ्या कलात्मकतेमुळे समाजासमोर एक प्रेरणादायी आदर्श निर्माण झाला असून कला ही केवळ प्रदर्शनासाठी नसून ती श्रद्धा, संस्कृती आणि समाजाशी जोडली गेली तर तिचे महत्त्व अधिक वाढते,असे मत अनेकांनी या उपक्रमाबाबत व्यक्त केले.



## जाहीर प्रगटन

कंधार येथील तदर्थ जिल्हा न्यायाधीश-२ यांच्या न्यायालयात
(समक्ष श्री बी.यु.चौधरी तदर्थ जिल्हा न्यायाधीश-२,कंधार)
दिवाणी किरकोळ अर्ज क्र.२३/२०२६

अर्जदार : १) मोतीराम पि.दिगांबर पोकले वय ३७ वर्षे, धंदा शेती व नौकरी, रा.तेलंगवाडी ता.कंधार जि.नांदेड, २) दिपा भ्र.मोतीराम पोकले वय २७ वर्षे, धंदा घरकाम, रा.तेलंगमवाडी ता.कंधार जि.नांदेड. आणि ३) सचिन पि.दिगांबर पोकले वय ३५ वर्षे, धंदा शेती, रा.तेलंगमवाडी ता.कंधार जि.नांदेड. ४) कावेरी भ्र.सचिन पोकले वय ३१ वर्षे, धंदा घरकाम, रा.तेलंगमवाडी ता.कंधार जि.नांदेड.

विरुद्ध

गैरअर्जदार :- निरंक

ज्या अर्थी उपरोक्त अर्जदार क्र.(१) मोतीराम दिगांबर पोकले व (२) दिपा भ्र.मोतीराम पोकले दोघे रा.तेलंगवाडी ता.कंधार यांनी त्यांची मुलगी आवणी वय ८ वर्षे हिस अर्जदार क्र.(३) सचिन दिगांबर पोकले व (४) कावेरी भ्र.सचिन पोकले दोघे रा.तेलंगवाडी ता. कंधार यांना दत्तक देण्यासाठी अर्जदार क्र.१ ते ४ यांनी कलम ५६ (४) बाल न्याय (काळजी व संरक्षण) अधिनियम अन्वये दत्तक घेण्याचा अर्ज या न्यायालयात दाखल केला आहे.

या द्वारे सर्वांना सुचित करण्यात येते की, सदरील प्रकरणात कुणाला आक्षेप असल्यास सदरचे जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाच्या आत या न्यायालयात स्वतः अथवा वकिला मार्फत हजर राहून सदरील प्रकरणात आपला आक्षेप नोंदवावा. अन्यथा सदरील प्रकरणात कुन्हा ति-हाईत व्यक्तिचा काही एक आक्षेप नाही असे ग्राह्य धरुन योग्य तो आदेश पारीत करण्यात येईल. याची नोंद घ्यावी.

सदरील प्रकरणाची पुढील तारीख १६/०६/२०२६ असून त्यानंतर आलेल्या आक्षेप ग्राह्य धरण्यात येणार नाहीत.

आज दिनांक ११/०५/२०२६ रोजी माझ्या सहि व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

आदेशावरुन

| | |
|---|---|
| स्वाक्षरित/- | स्वाक्षरित/- |
| **वरिष्ठ लिपीक** | **(अधिक्षक)** |
| जिल्हा न्यायालय कंधार | (जिल्हा न्यायालय कंधार) |

# कंधार तालुक्यात वीज कोसळून म्हैस ठार

कंधार/प्रतिनिधी-तालुक्यात दि.४ जून रोज गुरुवारी दुपारी अचानक वादळी वारा, जोराचा पाऊस त्यात विजांच्या तांडवाणे थैमान घालण्यास सुरुवात केली. या वादळी वाऱ्यासह पावसाने अनेकांच्या घरावरील पत्रे उडाली, विद्युत पोल मोडून पडले, त्यामुळे विद्युत पुरवठा खंडित झाला. अनेक ठिकाणी झाडे उन्मळून पडले. तर जंगमवाडी येथील नारायण सूर्यकांत वाडीकर या शेतकऱ्यांची एक सात वर्षाची दुभती म्हैस ठार झाली आहे.

येत्या काही दिवसांवर खरीप हंगाम हा तोंडावर येऊन ठेपला असून, शेती मशागतीचे कामे करण्यासाठी शेतकरी आपल्या जीवाची तमा न बाळगता उन्हाच्या तीव्र झळा सोसत शेती मशागत कामात व्यस्त झाला असल्याचे दिसून येत आहे. त्यात आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर म्हणजे ट्रॅक्टरच्या सहाय्याने नांगरटी, वखारणे व इतर शेती कामे करण्यास वेग आला आहे. अवेळी पडणारा अवकाळी पाऊस व विजांच्या कडकडाटामुळे शेतकऱ्यांसह शेतमजुरामध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे.दि.४ जून रोज गुरुवारी कंधार तालुक्यातील जंगमवाडी येथील शेतकरी नारायण सूर्यकांत वाडीकर यांची दुपारी अंदाजे साडेचार वाजण्याच्या सुमारास वादळी वाऱ्यामध्ये वीज कोसळून एक म्हैस जागीच ठार झाली असल्याची माहिती ग्राम महसूल अधिकारी अमर बसवंते यांनी दिली. फुलवळ येथील रहिवासी धोंडीबा बाबाराव कानगुले यांचे राहते घरावरील टीन पत्रे उडून घरातील जीवन आवश्यक वस्तूचे मोठे नुकसान झाले आहे. त्यामुळे गरीब परिस्थिती असलेले कानगुले कुटुंब उघड्यावर पडले असून, आर्थिक अडचणीत सापडले आहे.

## पदमीनबाई रावसाहेब सिरसाट यांचे निधन

नांदेड/प्रतिनिधी-उमरा येथील जेष्ठ महिला पदमीनबाई



रावसाहेब पाटील सिरसाट (वय ८०) यांचे दि.६ जून रोजी दुपारी वृद्धापकाळाने निधन झाले असून त्यांच्या पार्थिवावर दि.७ जून रोजी सकाळी १० वाजता उमरा येथे अंत्यविधी करण्यात येणार आहे. कै.पदमीनबाई रावसाहेब पाटील सिरसाट यांचे पश्चात एक मुलगा पाच मुली जावई, नाती, नातू असा मोठा परिवार आहे.

पान १ वरुन

## भुजबळ राज्यसभेवर तर...

छगन भुजबळ यांच्याच नावावर शिक्कामोर्तब होण्याची चिन्हे दिसत आहेत.भुजबळ यांची राज्यसभेवर वर्णी लागल्यास राज्यातील त्यांच्या राजकीय वारशाबाबतही चर्चा सुरू झाली आहे. सूत्रांच्या माहितीनुसार, केंद्रात जाणाऱ्या छगन भुजबळ यांनी आपल्या वाट्याचे मंत्रिपद आणि राजकीय प्रतिनिधित्व कुटुंबातच कायम राहावे, अशी भूमिका घेतली आहे.

## सोयीस्कर न्याय की,...

आव्हान देण्यात आल्याने याचिकेच्या स्वरूपाबाबत विविध तर्क-वितर्क व्यक्त केले जात आहेत. काही जाणकारांच्या मते, ९ जून रोजी होणाऱ्या सुनावणीत मतदारांच्या पात्रतेबरोबरच याचिकेतील निवडकपणाचाही मुद्दा चर्चेत येऊ शकतो.

पान १ वरुन

## 'बेटा,तुमसे ना हो पाएगा'!...

लावल्याने कार्यक्रमाला विशेष महत्त्व प्राप्त झाले. डिजिटल संघटना कॉक्रोच जनता पार्टीने पुकारलेल्या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर, शनिवारी (६ जून) दिल्लीभर सुरक्षा व्यवस्था कडक करण्यात आली असून, इंदिरा गांधी आंतरराष्ट्रीय विमानतळ, सीमा प्रवेशद्वार आणि इतर संवेदनशील ठिकाणी पोलिसांनी अतिरिक्त कर्मचारी तैनात केले आहेत. त्याच मोठ्या प्रमाणात तरुणाई आणि कॉक्रोच जनता पार्टीच्या आंदोलकांचा जमाव मोठ्या संख्येने दिसून आला आहे. धर्मेंद्र प्रधान इस्तीफा दो तसेच कॉक्रोच आ रहे है,धर्मेंद्र प्रधान जा रहे है अशा घोषणाबाजी आंदोलकांकडून करण्यात येत आहे. दुपारी तीनच्या सुमारास अभिजीत दीपके आणि सोनम वांगचुक आंदोलनस्थळावरून रवाना झाले. दरम्यान, आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर दिल्ली पोलिसांनी विशेष सुरक्षा व्यवस्था ठेवली होती. आंदोलनाच्या समर्थक आणि विरोधकांमध्ये तणाव निर्माण होण्याची शक्यता लक्षात घेऊन पोलिसांनी सहा जणांना ताब्यात घेतले आहे.

## महाराष्ट्रात मान्सूनचे...

कोकण पट्टा आणि त्यानंतर मराठवाडा, पश्चिम महाराष्ट्र व विदर्भातही पावसाचे आगमन होण्याची शक्यता आहे. मान्सूनच्या आगमनामुळे शेतकऱ्यांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे. हवामान विभागाने शेतकऱ्यांना शेतीपूर्व कामांना गती देण्याचे आवाहन केले असून पेरणीच्या तयारीला सुरुवात करण्यासाठी ही अनुकूल वेळ असल्याचे सांगितले आहे. दरम्यान, कोकण किनारपट्टीवर पावसाचा जोर वाढण्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. मान्सूनच्या आगमनामुळे उकाड्याने हैराण झालेल्या नागरिकांना दिलासा मिळाला असून आता संपूर्ण महाराष्ट्राचे लक्ष पुढील काही दिवसांत राज्यभर पाऊस कधी पोहोचतो याकडे लागले आहे.

हे वृत्तपत्र प्रकाशक, मालक व संपादक प्रदिप अनंतराव नागापूरकर यांनी मुद्रक अब्दुल गफुर अब्दुल रझाक यांच्या सिमा प्रिंटींग ॲण्ड लिथो प्रिंटींग प्रेस इतवारा बाजार नांदेड, ता.जि.नांदेड येथे छापून नागापूरकर हाऊस, हाऊस नं.१-१०-६९३, विनायकनगर, नवा मोंढा, ता.जि.नांदेड-२ येथे प्रकाशीत केले.आर. एन. आय. नं. ४७१३५/८८ E-mail: nandedwarta@mail.com, मो.९४२२१७४७७४